**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

(काही सन्माननीय सदस्य जय विदर्भ, जय मराठवाडा असा उल्लेख करतात )

**उप सभापती :** आपण सर्वजण महाराष्ट्रात राहतो याचे सर्वांनी भान ठेवावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या नागपूर हिवाळी अधिवेशनाकडे महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष लागलेले आहे. या सरकारचे हे चौथे अधिवेशन आहे. मागे तीन अधिवेशने झाली. त्या तीनही अधिवेशनामध्ये राज्यातील दुष्काळी भागाबाबत तसेच राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य तो भाव मिळावा या संदर्भात चर्चा झाली. आज राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापासाला भाव नाही,दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला भाव नाही, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव नाही, धान उत्पादक शेतकऱ्यांच्या धानाला भाव नाही. नागपूरमधील संत्री उत्पादक शेतकऱ्यांच्या संत्रा पिकाला भाव नाही. या सरकारने मागील हिवाळी अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेले कर्ज फेडण्याची घोषणा केली. आजपर्यंत सरकारने सावकारांचे 1 कोटी 4 लाख रुपयांचे कर्ज फेडले आहे. सावकाराकडून घेतलेले कर्ज फेडू शकत नाही म्हणून शेतकरी स्वतःच्या किडन्या विकू लागले आहेत, हे सरकारला शोभणारे नाही. सोयाबीन, नापिकी व कपाशीचे उत्पादन कमी झाल्यामुळे आणि या पिकांना भाव नाही म्हणून भारतीय स्टेट बँकेचे एक लाख रुपयांचे थकित कर्ज कसे फेडावे या विवंचनेमध्ये झुणका नावाच्या एका गावातील जामुणकर या 27 वर्षीय शेतकऱ्याने दिनांक 7 डिसेंबर 2015 रोजी अधिवेशन सुरु असताना आत्महत्या केली.

सभापती महोदय, या सरकारने मागील तीन अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी घोषणा केली. आता सरकार चर्चेला तयार होत आहे. आम्ही मागील तीनही अधिवेशनात चर्चा केल्या आहेत. परंतु सरकारने ज्या घोषणा केल्या त्या घोषणांची अंमलबजावणी झालेली नाही.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे अभ्यासपूर्ण वक्तव्य आम्ही कालही ऐकले आणि आजही ऐकले. आपण त्यांना बोलण्याची संधी दिल्यामुळे मी आक्षेप

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेतला नाही. या संदर्भातील विषय नियम 289 खाली दाखल झालेला आहे. त्या विषयावर माननीय सभापतींनी निर्णय देतो, चर्चा करु,असे सांगितले. सरकार चर्चेला पूर्ण तयार आहे. आपल्या

..2..



श्री.गिरीष बापट.....

नेहमीच्या प्रथा,परंपरेप्रमाणे आपण प्रथम प्रश्नोत्तरे घ्यावीत, त्यानंतर लक्षवेधी सूचना आणि आपण जो कार्यक्रम ठरवाल त्याप्रमाणे कामकाज घ्यावे. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण प्रश्नोत्तराचा तास सुरु करावा.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन फलक फडकावून घोषणा देत असतात)

**उप सभापती :** मी प्रश्नोत्तराचा तास पुकारत आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतच असतात)

माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपापल्या जागेवर जाऊन शांतपणे बसावे. मला इतर सन्माननीय सदस्यांना देखील बोलू द्यायचे आहे. मला कामकाज करु द्यायचे की नाही ?

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना सभागृहात मांडलेली आहे. मी सुद्धा त्याच विषयासंदर्भात नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. हा विषय नियम 289 चा होऊ शकतो. मागील एक वर्षात शासनाने शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात जो अभ्यास केलेला आहे तो अभ्यास लक्षात घेता, या ठिकाणी शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची घोषणा केली पाहिजे. शासन शेतकऱ्यांना किती पॅकेज देणार आहे, त्याची घोषणा केली पाहिजे. हे सरकार नेहमी सांगते की,आम्हाला लाँगटर्म प्रोग्राम हातामध्ये घ्यावयाचा आहे. तेव्हा त्या विषयावर सविस्तर चर्चा होऊ शकते. आम्हाला शेतकऱ्यांच्या आत्महत्येची काहीच माहिती नाही, शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे आत्महत्या करीत आहेत, त्यासंबंधीची सुतराम कल्पना आम्हाला नाही, असे सरकारने सांगावे. त्याबाबत आमचे काहीही म्हणणे नाही. ही वास्तविकता शासनाच्या लक्षात आली असेल तर शासनाने प्रथम त्या संदर्भातील घोषणा करावी. आत्महत्येच्या घटना घडू नयेत म्हणून पुढे कोणता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कार्यक्रम हाती घ्यावयाचा त्या संदर्भात आम्ही चर्चा करावयास तयार आहोत.

....B-1

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

शेतकऱ्यांच्या आत्महत्या या कर्जबाजारीपणामुळे होतात हे शासनाला मान्य आहे. शासनाचे तशा प्रकारचे अहवाल आहेत. त्यामुळे शासनाने सर्वप्रथम शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली पाहिजे, हीच आमची सर्वप्रथम मागणी आहे. त्यानंतर शासनाला जी काही चर्चा करावयाची असेल ती करावी, परंतु.....

**उप सभापती** : मी आता प्रश्नोत्तराचा तास पुकारतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य फलक घेऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर येऊन घोषणा देतात.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

***शीना बोरा या तरुणीच्या हत्येबाबत***

***(१) * ११९५७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-***

***(१) सन २०१२ मध्ये हत्या झालेल्या शीना बोरा या तरुणीचा मृतदेह तीन वर्षानंतर माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान पनवेल (जि. रायगड) येथे सापडल्यामुळे सदर घटना निदर्शनास आली, हे खरे आहे काय,***
***(२) असल्यास, सदर हत्येबाबत पोलीस तपास करण्यात आला आहे काय,***
***(३) असल्यास, तपासात काय आढळून आले व त्यानुसार हत्या करणा-यांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?***

***डॉ.रणजित पाटील, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता :*** (१) ***होय,***
***(२) सदर घटनेबाबत दिनांक*** २५.८.२०१५ ***रोजी खार पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.***४०६/१५, ***भां.द.वि.कलम*** १२० ***(ब) सह*** ३६४, ३०२, २०१ ***अन्वये नोंद करण्यात आला आहे.***
***(३) सदर गुन्ह्याचा तपास शासन अधिसूचना क्र. एमआयएस*** २०१५/***प्र.क्र.*** १४/***पोल-***११ ***दिनांक*** १८.९.२०१५ ***अन्वये सी.बी.आय.कडे वर्ग करण्यात आला आहे.***

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य फलक घेऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देतच असतात.)

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रात आणि खासकरुन मुंबई पोलिसांच्या कार्यपध्दतीबद्दल अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. केवळ विदर्भात नव्हे तर संपूर्ण राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेकडे सर्वांचेच लक्ष लागलेले आहे.

सभापती महोदय, एक व्यक्ती तीन वर्षांपूर्वी हरविते. त्या संदर्भात संबंधित पोलीस स्टेशनच्या माध्यमातून या प्रकरणी नेमकी काय कार्यवाही झाली या बाबतचा माझा प्रश्न आहे. महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये नागपूर, बुलढाणा, पुणे, ठाणे या जिल्ह्यातील कायदा व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11957...

डॉ.नीलम गोऱ्हे....

सुव्यवस्थेबाबतचे प्रश्न आहेत. त्यामुळे मी शीना बोरा या तरुणीच्या हत्येच्या अनुषंगाने विचारु इच्छिते की, या हत्ये प्रकरणी पेण, रायगड पोलीस अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. तिचा मृतदेह मिळाल्यानंतर केवळ पोलीस स्टेशनमध्ये नोंद करण्यात आली होती. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारते की, सदरहू हत्येप्रकरणी निष्काळजीपणा करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आलेली आहे ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य फलक घेऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देतच असतात.)

**उप सभापती** : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.12 ते 12.22 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

..सी-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे

( पुढे सुरू ....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन फलक दाखवून घोषणा देत असतात.)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा प्रश्न सुरू होता.

**उप सभापती** : प्रश्न क्रमांक 12591 ....

**खामगांव (जि.बुलढाणा) शहरातील गणेशमुर्ती विटंबना प्रकरणी मुख्याधिकारी यांचेवर कारवाई करणेबाबत**

**(2) * 12591 श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) खामगांव नगर परिषदेच्यावतीने गणेश मिरवणुकी दरम्यान फिरत्या जलकुंडाची व्यवस्था करण्यात आली, त्यात गणेशमुर्ती विसर्जित करण्याचे आवाहन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या पर्यावरण पुरक उपक्रमाच्या नावाखाली पालिकेने फिरत्या जलकुंडातत नागरिकांनी विसर्जित केलेल्या मुर्त्या पालिकेच्या वाहनांनी चक्क डंपींग ग्राऊंडवर (कच-याची विल्हेवाट लावण्याची जागेवर) टाकून दिल्या, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर प्रकार हा धार्मिक भावना भडकवणारा असून या प्रकरणी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांचेवर कारवाई करण्याबाबत तक्रार संबंधित पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, या प्रकरणाची जबाबदारी मुख्याधिकारी, नगर परिषद खामगांव यांचेवर निश्चित करुन त्यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे काय,
(5) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या पत्रानुसार कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय ?

**डॉ. रणजित पाटील, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.
(2) हे खरे नाही.
(3) प्रश्न भाग १ व २ येथील वस्तुस्थिती खरी नसली तरीही स्थानिक नागरिकांनी दि.३०/९/२०१५ रोजी गणेश मूर्ती नगरपरिषदेच्या नवीन प्रस्तावित डंपिंग ग्राऊंडवर टाकल्याबाबत केलेल्या लेखी तक्रारीवरुन पोलीसांनी अध्यक्ष व मुख्याधिकारी न.प.खामगांव यांचेवर गुन्हा क्रमांक ८०/२०१५, भा.दं.वि. कलम २९५, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.
(4) व (५) या प्रकरणी प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी बुलढाणा यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12591 ....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक दाखवून घोषणा देतच असतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : प्रश्नाच्या क्रमांक 1 ला "हे खरे नाही." असे सांगितले आहे. तसेच प्रश्नाच्या क्रमांक 2 ला देखील "हे खरे नाही." असे सांगितले आहे. सर्वांनी तक्रारी केल्या आहेत आणि गुन्हे दाखल झाले आहेत. मुख्याधिकाऱ्यांनी गुन्हा केलेला आहे. मुख्याधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करुन चालणार नाही. हिंदूंच्या भावना दुखाविण्याचे कार्य केले आहे, त्यासाठी त्यांना ताबडतोब निलंबित केले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

डॉ. रणजित पाटील : सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न आणि त्यातून मिळालेल्या माहितीमधून असे लक्षात येते की, खरोखरच गणेश विसर्जनाच्या बाबतीत स्थानिक प्रशासनाकडून गणेश विसर्जनाच्या आधी आवाहन करण्यात आले होते की, गणेश विसर्जन करावयाचे असेल तर आम्ही त्यासाठी कुंभ तयार करू. वास्तविक स्थिती अशी झाली की, 27 तारखेला कोणत्यातरी कंत्राटदाराला सांगून एका ट्रॅक्टरमध्ये ताडपत्री टाकून त्यामध्ये थातुरमातुर जलकुंभ तयार करण्यात आला. अर्धवट विसर्जन झालेल्या गणेशमुर्ती डम्पिंग ग्राऊंडवर नेऊन टाकल्या. प्रथमदर्शनी सर्व चौकशीवरुन असे दिसते की, स्थानिक प्रशासकीय अधिकारी यामध्ये दोषी होते. यामध्ये जे कोणी दोषी असतील, मग ते नगर परिषदेचे मुख्याधिकारी असतील वा कोणीही असतील, चौकशीअंती त्यांच्यावर एफआयआर दाखल केलेला असेल तरी, त्यांच्यावर चौकशीअंती कडक कारवाई करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता चौकशीची गरज राहिलेली नाही. पंचनामे झाले आहेत. गुन्हे रजिस्टर झाले आहेत. त्यामुळे मुख्याधिकाऱ्यांवर ताबडतोब निलंबनाची कारवाई करावी अशी मी मागणी करतो.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, यामध्ये एफआयआर नोंद झालेला आहे. प्रथमदर्शनी असे दिसत आहे की, यामध्ये सर्व धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत. मूर्ती विटंबनेमुळे व डम्पिंग ग्राऊंडवर केलेल्या प्रकारावरुन असे दसते की, त्यांच्यावर कडक कारवाई अग्रेषित करावीच लागेल.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12591 ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुख्याधिकाऱ्यांना निलंबित केले पाहिजे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मुख्याधिकाऱ्यांवर निलंबिनाची सुध्दा कारवाई केली जाईल. लक्षात आले आहे की, यामध्ये सर्व पुरावे आहेत, गुन्हा नोंद झालेला आहे. त्यामुळे सदर मुख्याधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई सुध्दा केली जाईल.

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर शहरात विना परवाना सुरु असलेले हुक्का पार्लर बंद करण्याबाबत**

**(3) * 11024 श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) युवकांना नशा करण्याकरिता नागपूर शहरात विना परवाना हुक्का पार्लर सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, नागपूर महानगरपालिका किंवा नागपूर शहर पोलीस यांची कोणतीही परवानगी न घेता हे हुक्का पार्लर सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने हे हुक्का पार्लर त्वरित बंद करण्याकरिता सदरचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. रणजित पाटील, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(3) होय, हे खरे आहे.
(4) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सर्व पोलीस स्टेशन आणि गुन्हे शाखेच्या पथकांना हुक्का पार्लर सुरु असल्याची बातमी मिळाल्यास अगर प्रत्यक्ष दिसल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार एकूण ३१ हुक्का चालविणारे चालक/विनापरवाना रेस्टॉरंट हुक्का विक्री करतांना आढळून आल्याने त्यांचेविरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३३ सहकलम १३१ अन्वये कारवाई करण्यात आलेली असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

प्रा. अनिल सोले : सभापती महोदय, हुक्का पार्लरच्या अनुषंगाने शासनाने कोणत्या प्रकारचा निर्णय घेतलेला आहे ? आमची मागणी आहे की, हुक्का पार्लर तातडीने बंद करण्यात यावेत. शासनाने याबाबतीत खुलासा करावा.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मूलभूत प्रश्न विचारला आहे. हुक्का पार्लरच्या बाबतीत नागपूरमध्ये 31 कारवाया झालेल्या आहेत. कलम 33 नुसार व केंद्र शासनाच्या कोटपा कायद्यांतर्गत कारवाई होते, त्यामुळे हुक्का पार्लरवर नाममात्र म्हणजे 200 रूपयांचा दंड आणि सी समरी केली जाते. सदर बाबतीत असा कोणता तरी कायदा असावा, ज्यामुळे हुक्का पार्लरच्या बाबतीत प्रश्न विचारले जातील. त्यामुळे याबाबतीतील सुध्दा ....

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

**उप सभापती** : अशा स्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.27 ते 12.42 पर्यंत स्थगित झाली.)

----

....D

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी.:** विना अनुदानित शाळांना अनुदान देणे

**मु.शी.:** विना अनुदानित शाळांना अनुदान देणे या संबंधी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण आणि क्रीडा, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याच्या संदर्भात मला निवेदन करावयाचे आहे. या संदर्भात मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सन 2009 नंतर निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अधिन राहून विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याबाबत शासन सकारात्मक विचार करील.

-------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उप सभापती :** सभागृहात कामकाज करण्यासारखी परिस्थिती नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करतो.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, गुरुवार, दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 12 वाजून 43 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 10 डिसेंबर, 2015 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही